राज्यात उत्पादित होणाऱ्या मळीची निर्यात नियंत्रणमुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमपीएल-१२१३/प्र.क्र.५५९/ राउशु-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ४ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना:

सन २०१५ च्या विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानसभा सभागृहात झालेल्या घोषणेच्या अनुषंगाने राज्यात उत्पादित होणाऱ्या मळीची निर्यात नियंत्रणमुक्त करण्याच्या दृष्टीने प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन परराज्यात/ परदेशात मळी निर्यातीस परवानगी देण्याचे अधिकार प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांच्या कालावधीकरिता जिल्हाधिकारी यांना दि.१५ मे, २०१५ च्या पत्रान्वये देण्यात आले होते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर आढावा घेवून याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

राज्यात उत्पादित होणाऱ्या मळीच्या परराज्यात / परदेशात निर्यातीस परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत. परराज्यात / परदेशात मळी निर्यातीस परवानगीबाबतचे प्रस्ताव आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क व शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी यांनी प्रचलित नियम आणि खालील बाबींची पूर्तता करुन याबाबतच्या प्रस्तावांना त्यांचे स्तरावर परवानगी द्यावी.

अ) <u>परराज्यातील निर्यात:-</u>

१) संबंधीत राज्याच्या अबकारी विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र.
२) संबंधीत राज्यात घटकास मळी बाळगणे/वापरणे करिता मंजूर असलेली विधीग्राहय अनुज्ञप्तीची प्रत.
३) महाराष्ट्र राज्यातील संबंधित साखर कारखान्याने दिलेले संमतीपत्र/सेल ऑर्डर.
४) विहीत शुल्क वसुल करणे.
५) मळीची निर्यात साखर कारखाना ते महाराष्ट्र राज्याच्या सीमेजवळील शेजारील राज्याच्या सीमा तपासणी नाक्यापर्यंत पथरक्षणाखाली करण्यात यावी.
६) प्रत्येक निर्यात परवान्यावर मळीचा विश्लेषण अहवाल प्राप्त करुन निर्यात केल्या जाणा-या मळीचा TRS नमुद करण्यात यावा.
७) निर्यात झालेल्या मळीची EVC ३० दिवसाच्या आत प्राप्त होणे आवश्यक राहील. पुर्वीच्या निर्यातीबाबत EVC प्राप्त झाल्यानंतरच पुढील निर्यातीस एम-५ परवाना मंजुर करण्यात यावा.
८) सदर मळीची राज्याबाहेर निर्यात करतेवेळी महाराष्ट्र सीमेच्या तपासणी नाक्यावर मळीच्या टॅन्करचे पुन्हा वजन करुन मळी निर्यात पासावर नमुद केल्याप्रमाणे असल्याची खात्री करुन तशी नोंद ज्या तपासणी नाक्यावर मळीची निर्यात होईल त्या नाक्यावरील निरीक्षकांनी

निर्यात पासावर करावी. रेल्वेने मळीची निर्यात होत असल्यास ही अट लागू होणार नाही.

९) निर्यात होणा-या मळी पासून मद्यार्काचा उतारा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे परिपत्रक क्र.मळी ११२००१/ १३१०/५-अ दि.१२-९-२००२ अन्वये निर्धारीत प्रति टन किमान २५० ब.लि. म्हणजेच ४१५ प्रुफ लिटर पेक्षा कमी नसावे.

१०) निर्यातदार घटक कार्यान्वित आहे किंवा बंद आहे याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

११) मळी निर्यातीची परवानगी दिल्यानंतर ज्या राज्यात हे घटक आहेत त्या राज्यातील आयुक्त/अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडून साठा मिळाल्याबाबतचे ट्रक नंबर/चालकाच्या नावासहीत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

१२) इतर राज्यांनी काळया यादीत (Black Listed) समाविष्ट केलेल्या घटकांना निर्यातीस परवानगी देऊ नये.

<u>ब) परदेशातील निर्यात:-</u>

१) मान्यताप्राप्त निर्यात घटक असल्याबाबतचे प्रमाणपत्र (रजिस्टर्ड एक्सपोर्ट हाऊस)

२) विदेशी आयातदार यांच्याबरोबर केलेले आयातीबाबतीचे ऑर्डर्स व करारपत्र.

३) राष्ट्रीयकृत किंवा इतर बँकामार्फत निर्यात करण्याबाबतचे मान्यता दिलेले क्रेडिट किंवा तत्सम पत्र.

४) राज्यातील ज्या बंदरातून मळीची निर्यात करावयाची आहे त्या ठिकाणचे निर्यात व्यवस्था व अद्ययावत CRZ परवानगी.

५) घटक प्रथम निर्यात करीत आहे किंवा मागील काळात निर्यात केली असल्यास त्या निर्यातीबाबतचा तपशील.

६) जीएमपी (GMP) प्रमाणपत्र, जेणेकरुन निर्यातीबाबतचा दर्जा दर्शविला जातो.

७) परिवहन परवाना मंजूर करताना संबंधित साखर कारखान्यांकडून निर्यात होणा-या मळीचा विश्लेषण अहवाल प्राप्त करुन प्रत्येक परवान्यावर निर्यात केल्या जाणा-या मळीचा टिआरएस नमूद करण्यात यावा.

८) नियमानुसार योग्य ते प्रशासकीय शुल्क वसुल करणे बंधनकारक राहील.

९) साखर कारखाना ते राज्यातील निर्यातीचे बंदरापर्यंत होणारी वाहतूक पथरक्षणाखाली करणे बंधनकारक राहील. (शासन आदेश क्र.एमएलएस.१९९५/५/इएक्ससी-२, दि.०६.१२.१९९६ नुसार)

१०) कोणत्याही परिस्थितीत परदेशातील निर्यात ही राज्यातील बंदरातुनच करावी लागेल.

उपरोक्त नमूद केल्यानुसार परराज्यात/परदेशात मळी निर्यातीस परवानगी दिल्यानंतर त्याबाबत किती घटकांना व किती परिमाणाची परवानगी दिली ? किती प्रकरणात EVC प्राप्त झाल्या याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधीत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०४१७१०१०५७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2016.01.04 18:23:41 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, गृह विभाग.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
२) मा.मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
३) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४) मा.राज्यमंत्री (राउशु), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
५) मा.राज्यमंत्री (सहकार), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
६) प्रधान सचिव (राउशु), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गो.ते. रुग्णालय, मुंबई,
७) प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,
९) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे,
१०) सर्व जिल्हाधिकारी,
११) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
१२) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१३) निवड नस्ती.